रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ४७
www.ramprahar.com
बुधवार, ३ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

नेरळमध्ये सोन्याचे दागिने आणि रोकड चोरली/२
लोकशाही दिनामध्ये नागरी तक्रारींचे निवारण/३
फार्महाऊसमधून बंदूकीसह गोळ्यांची चोरी/७

### एसटी महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमीन वापरास मान्यता



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींच्या व्यापारी तत्त्वावर वापरासंदर्भात सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सार्वजनिक-खासगी भागिदारीतून विकसित होणाऱ्या प्रकल्पाच्या भाडेपट्टीची मुदत ही ६० वर्षावरून ९८ वर्षापर्यंत वाढवण्यात आली आहे. मुंबई महानगरातील एसटीच्या जागांचा विकास आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी आणि महामंडळाच्या शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी डीसीपीआर २०३४ व युडीसीपीआर २०२०नुसार व्यापारी वापरास परवानगी दिली जाणार आहे. या निर्णयामुळे महामंडळाच्या ताब्यातील निष्क्रिय जमीन उपयुक्त वापरात आणली जाईल, नव्या प्रकल्पांना चालना मिळेल तसेच एसटी महामंडळाला मोठा आर्थिक फायदा होऊन प्रवाशांना दर्जेदार सेवा पुरविण्यास मदत होईल.

# मनोज जरांगेंचे उपोषण अखेर मागे

## विविध मागण्यांसंदर्भात सरकारी जीआर जारी



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसलेले मराठा नेते मनोज जरांगे पाटील आणि राज्य सरकार यांच्यात मंगळवारी (दि.२) सकारात्मक चर्चा झाली. त्यानंतर याबाबतचा सरकारी अध्यादेश (जीआर) निघाला. मग जरांगे यांनी पाच दिवसांपासून सुरू असलेले उपोषण अखेर सोडले.

मंत्रिमंडळ उपसमितीने मनोज जरांगे यांची भेट घेतली आणि मसुद्यामध्ये काय तरतूद केली आहे याची माहिती दिली. या समितीमध्ये अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री उदय सामंत, मंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री प्रताप सरनाईक आदींचा समावेश होता. आधी शिंदे समितीने जरांगे यांच्याशी चर्चा केली होती. नंतर या संदर्भात उपसमितीशी चर्चा केली. त्यानंतर उपसमितीने मराठा आरक्षणाचा अंतिम मसुदा तयार केला आणि तो जरांगे यांना दिला.

या वेळी झालेल्या चर्चेत हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला उपसमितीने मान्यता दिली आहे. मराठा आणि कुणबी एकच असल्याच्या मागणीचा जीआर काढण्यासाठी सरकारला दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. सातारा गॅझेटियरची अंमलबजावणी एका महिन्यात केली जाणार असून या प्रक्रियेत कायदेशीर बाबी तपासल्या जातील.

मराठा आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत मागे घेण्यासाठी सरकार न्यायालयात जाणार आहे. मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबांना एका आठवड्यात आर्थिक मदत दिली जाईल तसेच त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला एसटी महामंडळात नोकरी दिली जाईल. याशिवाय ५८ लाख नोंदींचे रेकॉर्ड ग्रामपंचायतींमध्ये लावले जाणार आहे आणि जिल्हास्तरावर जातवैधतेची पडताळणी जलद गतीने होईल, असे चर्चेत सहमतीने ठरले.

या संदर्भात माहिती देताना उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणासंदर्भात जीआर निघाला आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात मराठा आरक्षण लागू केले जाणार आहे. जीआर निघाल्यानंतर दोन दिवसांत त्याचे आदेश जिल्हा स्तरांवर पाठविले जातील. यानंतर ज्यांची मागणी असेल त्यांना कुणबी प्रमाणपत्र दिले जाईल.

### महाराष्ट्रासाठी आजचा दिवस सोन्याचा -मनोज जरांगे

**मुंबई** : मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांच्या जवळपास सर्व मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या आहेत. त्यानंतर जरांगे यांनी आपले उपोषण सोडत सरकारचे आभार मानले. या वेळी त्यांना अश्रू अनावर झाल्याचे पहायला मिळाले.

उपोषण सोडल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना मनोज जरांगे यांनी म्हटले की, महाराष्ट्रात मराठ्यांचा विजय झाला आहे. आजचा दिवस सोन्याचा दिवस आहे. माझ्या जातीचे कल्याण झाले. मला त्याचा आनंद आहे. पश्चिम महाराष्ट्रात आणि मराठवाड्यातील सगळ्या मराठ्यांचे कल्याण झाले. माझी लेकरे आता सुखी राहतील. सर्व आंदोलकांनी आता मुंबईतून पुन्हा आपापल्या गावी जाताना शांततेत जावे.

मनोज जरांगे पाटील यांच्या बहुतांश मागण्या राज्य सरकारने मान्य केल्यानंतर मराठा आंदोलकांनी एकच जल्लोष केला. या वेळी त्यांनी जरांगे यांच्या नावाने जोरदार घोषणाबाजी करीत परिसर दणाणून सोडला.

### सर्व समाजासाठी काम करत राहीन -मुख्यमंत्री



**मुंबई** : मराठा समाज आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने जीआर काढल्यानंतर आंदोलक नेते मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत सरकारच्या या शिष्टाईचे श्रेय मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीला दिले तसेच मी सर्व समाजासाठी काम करतच राहीन, असे सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हैदराबाद गॅझेट लागू करण्याकरिता आमची सुरुवातीपासून तयारी होती, पण मनोज जरांगे पाटील यांची मागणी होती सरसकटची. त्याच्यात कायदेशीर अडचणी होत्या. हायकोर्टाचे व सुप्रीम कोर्टाचे निर्णय बघता अशा प्रकारे सरसकट करणे शक्य नव्हते आणि वस्तुस्थिती त्यांच्या लोकांच्याही लक्षात आणून देण्यात आली. मंत्रिमंडळ उपसमितीने जरांगे पाटील यांच्या टीमला लक्षात आणून दिले की, आपल्या कायद्याप्रमाणे आणि देशाच्या संविधानाप्रमाणे आरक्षण हे समूहाला नसते, तर ते व्यक्तीला मिळत असते आणि त्या व्यक्तीने ते क्लेम करायचे असते. म्हणूनच अशा प्रकारे सरसकट करता येणार नाही. ते कायद्याच्या पातळीवर टिकणार नाही. जरांगे यांनीदेखील भूमिका समजून घेतली व स्वीकारली.

जरांगे यांच्या इतरही काही मागण्या मान्य आम्ही केल्या आहेत, असे सांगून राजकारणात टीका होत असते, पण मी सर्व समाजासाठी, प्रत्येक व्यक्तीसाठी काम करतच राहणार, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.



## गौरी-गणपतींना भावपूर्ण निरोप



**अलिबाग : प्रतिनिधी**

लाडक्या गणेशाची सात दिवस मनोभावे पूजाअर्चा केल्यानंतर रायगडकरांनी मंगळवारी (दि.२) त्याला भावपूर्ण निरोप दिला. गणपतींसोबत गौरींचेही वाजत गाजत विसर्जन करण्यात आले.

दुपारी ४ वाजल्यानंतर ठिकठिकाणी गणेश विसर्जन मिरवणुका विसर्जनस्थळी निघाल्या. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असा आर्जव करीत वाद्यांच्या गजरात निघालेल्या या मिरवणुकांमध्ये गुलालाची उधळण होत होती. ढोल-ताशा, नाशिक बाजा, बेन्जोच्या तालावर थिरकत मिरवणुका पुढे सरकत होत्या. दक्षिण रायगडमधील महाड, श्रीवर्धन, माणगाव, म्हसळा, मुरूड, रोहा तालुक्यांमध्ये मिरवणुकांमध्ये पारंपरिक सनई खालूबाजासह लेझीम घेऊन नाचणारे गणेशभक्त आजही पहायला मिळत होते, तर काही गणेशभक्तांनी टाळ मृदंगाच्या साथीने भजन करीत मिरवणूक काढली.

रात्री उशिरापर्यंत मिरवणुका सुरू होत्या. महिलाही मोठ्या संख्येने या मिरवणुकांमध्ये सहभागी झाल्या होत्या व त्या फेर धरून नाचत होत्या. अधूनमधून बरसणाऱ्या पावसाच्या सरींचा भाविकांच्या उत्साहावर परिणाम झाला नाही.

आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी अलिबागकरांनी समुद्र किनारी मोठी गर्दी केली होती. विसर्जनस्थळी होणाऱ्या सामुदायिक आरत्यांनी परिसर दुमदुमून गेला. बाप्पाला निरोप देताना वातावरण भारावून गेले होते. ग्रामीण भागात नदी, तळे, ओढे यामध्ये, तर शहरी भागात समुद्र, तलावांमध्ये मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

रायगड जिल्ह्यात ५६ हजार ४६८ गणपतींसह १६ हजार १७५ गौरींचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक व्यवस्थेत थोडा बदल करण्यात आला होता.

## निवडक

### आईच्या अवमानावरून पंतप्रधान मोदींनी विरोधकांना फटकारले

**दरभंगा** : काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिहारमध्ये काढलेल्या वोट अधिकार यात्रेत एका व्यक्तीने मंचावर येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या आईबद्दल अपशब्द काढले होते. दरभंगा येथे बोलताना पंतप्रधान मोदींनी या प्रसंगावर भाष्य करीत हा फक्त माझ्या आईचा नाही, तर देशातील प्रत्येक आईचा, बहिणीचा आणि मुलीचा अपमान आहे, असे म्हणत विरोधकांना फटकारले.

### अभिनेत्री रान्या रावला तब्बल १०२ कोटी रुपयांचा दंड

**बंगळुरू** : सोन्याची तस्करी केल्याप्रकरणी बंगळुरूमध्ये तुरुंगात असलेली कन्नड चित्रपट अभिनेत्री रान्या राव हिला महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) १०२ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी बंगळुरू मध्यवर्ती कारागृहात कैद असलेल्या रान्याला नोटीस पाठवली आहे.

## गणेश दर्शन



पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील आणि आमदार विक्रांत पाटील यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे विसर्जनापूर्वी दर्शन घेतले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते.

## जंजिरा किल्ला खुला करण्यासाठी पुरातत्व विभागाच्या हालचाली

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुडजवळील प्रसिद्ध जंजिरा किल्ला पावसाळी हंगामात पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात येतो आणि पावसाळा संपल्यावर पुन्हा खुला केला जातो. त्यानुसार पुरातत्व खात्याने हालचाली सुरू केल्या आहेत.



पावसाळ्यात १ जून ते ३१ ऑगस्ट या काळात समुद्र खवळलेला असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव जंजिरा किल्ल्याकडील प्रवासी वाहतूक पुरातत्व खात्याकडून दरवर्षी बंद ठेवली जाते. पावसाळ्यानंतर ती पूर्ववत होते. सध्या पावसाचे प्रमाण कमी झाले असून वाऱ्याचा वेगसुद्धा मंदावला असल्याने जलवाहतुकीस अडचण होणार नाही. त्यामुळे यंदा जंजिरा किल्ला सप्टेंबर महिन्यात सुरू होईल, अशी अपेक्षा आहे.

या संदर्भात पुरातत्व खात्याचे सहाय्यक संवर्धक बी.जी. येलीकर यांना विचारले असता ते म्हणाले की, डागडुजी व किल्ल्यातील झाडेझुडपे साफ करण्यासाठी किमान १० ते १५ दिवस लागणार आहे. कोकणात गणेशोत्सवामध्ये स्वच्छता करणारे मजूर उपलब्ध होत नाहीत. २० सप्टेंबरपर्यंत किल्ल्याची अंतर्गत साफसफाई करण्याचा आमचा प्रयत्न असून अंतर्गत साफसफाई होताच किल्ला पर्यटकांसाठी खुला करणार आहोत.



(छाया : करण वाइळकर)

पनवेल : ओंकार मित्र मंडळाने प्रतिष्ठापना केलेला पनवेलचा ओंकारेश्वर.



दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलसोबत यंदाचा गणेशोत्सव साजरा करा...

गणेशोत्सव बुधवार, दि.27 ऑगस्टपासून सुरू झाला आहे. या पर्वणीत आपल्या गणपतीचा फोटो दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलवर **विनामूल्य** प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यामुळे आपण आपल्या बाप्पाचा फोटो, सोबत **आपले नाव व पत्ता ramprahar@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवा.** फोटो चांगला असल्यास त्याला रामप्रहर आणि मल्हार चॅनेल या दोन्ही ठिकाणी विनामूल्य प्रसिद्धी देण्यात येईल.

राम प्रहर
दिवाळी २०२५
मुक्तछंद

मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...

ramprahar@gmail.com

# पुढच्या वर्षी लवकर या! गौरी गणपतींचे विसर्जन



**कर्जत :** तालुक्यात सहा हजार ७६ सात दिवसांच्या गणपती बाप्पा तसेच २६१९ गौरींचे वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले. तालुक्यातील आठ सार्वजानिक गणेश उत्सव मंडळांच्या गणेश मूर्तींचेदेखील विधिवत विसर्जन करण्यात आले. दरम्यान, नेरळ येथील मुस्लिम मस्जिदसमोर गणेशभक्तांना गुलाबपुष्प देण्याचा सोहळा झाला. कर्जत नगर परिषदेकडून सर्व गणेश विसर्जन घाटांवर विजेची रोषणाई करण्यात आली होती आणि बैठक व्यवस्था करण्यात आली होती.



**मुरूड :** पोलीस ठाण्या हद्दीतील २२९२ गणपती, तर २५१ गौरींचे विसर्जन ढोल ताशाच्या गजरात फटक्यांची आतषबाजी करत मंगलमय वातावरणात करण्यात आले. गौरी गणपतीला भक्तांकडून भावपूर्ण निरोप देण्यात आला. येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांसाठी बाजारपेठ मित्र मंडळाच्या वतीने थंड पेयची सोय करण्यात आली होती.



**पाली :** टेरेसवर कृत्रिम टाकीमध्ये गणेश विसर्जन करताना बारसकर कुटुंबीय.



**श्रीवर्धन :** शहर व परिसरात सात दिवसांच्या गणरायाच्या निरोप सोहळ्याने मंगळवार दुपारपासून ते उशिरापर्यंत वातावरण भावपूर्ण झाले. लाडक्या बाप्पाचे स्वागत जितक्या भक्तिभावाने व उत्साहात झाले होते, तितक्याच भावनांनी ओथंबून त्यांना निरोप देण्यात आला. गौरीच्या विसर्जनावेळी महिलांनी पारंपरिक पोशाख घालून नदीकाठी व समुद्रकिनाऱ्यावर एकत्र येऊन गाणी, ओव्या म्हणत जलाशयात गौरींना निरोप दिला.



**माणगाव :** तालुक्यातील सात दिवसांच्या सार्वजनिक व घरगुती गणपतींचे तसेच गौरींचे उत्साहात व भक्तीमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. या वेळी माणगाव पोलीस ठाण्यातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नगरपंचायतीतर्फे गणेश विसर्जनाची चांगली व्यवस्था करण्यात आली होती.



**मोहोपाडा :** गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या... असा गजर करीत रसायनी व आसपासच्या परिसरातील गौरी-गणपतींचे मंगळवारी सायंकाळी भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले. परिसरातील पाताळगंगा नदी, मोहोपाडा तलाव, रिस पूल, कांबे गणेश घाट, वावेघर गणेश घाट, वाशिवली गणेश घाट, बारवई गणेश घाट आदी ठिकाणी भजने गाऊन सात दिवसांच्या शेकडो गणेशांचे आणि गौराईंचे पाताळगंगा नदीवर विसर्जन करण्यात आले.



**खालापूर :** मुळगाव डीपी रोड, कृत्रिम तलाव मोगलवाडी, शंकर मंदिर वरची खोपोली, रहाटवडे शिळफाटा पाताळगंगा नदीपात्रात गौरी गणपतींचे विसर्जन करण्यात आले. ग्रामीण भागातही नदीपात्रात विसर्जन हे टाळ मृदंगाच्या गजरात ढोल, लेझीम, ताशा अशा वाद्यांनी मिरवणुकीद्वारे मोठ्या भक्तिभावाने करण्यात आले.



**अलिबाग :** गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष करत ढोल ताशाच्या ठेक्यावर आणि भजनाच्या मंगल सुरात मंगळवारी रायगड जिल्ह्यातील गौरी-गणपतीचे विसर्जन करण्यात आले. वाडगाव येथेही भक्तांनी लाडक्या बाप्पाला डोक्यावरून विसर्जन स्थळी वाजतगाजत नेऊन निरोप दिला.



**माणगाव :** बामणोली रोड येथे गणपती विसर्जनाच्या वेळी नगरसेवक अजित तार्लेकर, ॲड. मयुरा तार्लेकर, अजिंक्य जाधव, आरोग्य सेवक प्रमोद मोरे यांनी भाविकांचे स्वागत केले.

## नेरळमध्ये सात तोळे सोने, सहा लाखांची रोकड चोरली

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या राजेंद्र गुरुनगर येथील अंबिका अपार्टमेंट इमारतीत मोठी चोरीची घटना घडली आहे. गणेश संनगरे यांच्या पहिल्या मजल्यावरील घरात झालेल्या या चोरीत तब्बल ७ तोळे सोने व ६ लाख रुपये रोख रक्कम असा ऐवज लंपास झाला आहे.

घरातील सदस्य सकाळी १० वाजता बाहेर गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील लॉकर फोडले. यामधून दोन गंठण, चैन, ब्रेसलेट, अंगठी अशा दागिन्यांसह रोकड असा मोठा ऐवज चोरून नेला. चोरीसाठी वापरलेला लोखंडी रॉड घराजवळ काही अंतरावर पोलिसांना आढळून आला आहे.

चोरीची माहिती मिळताच नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी तत्काळ चार शोधपथके तयार केली आहेत. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे.

घटनास्थळी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड व नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे यांनी पाहणी केली. या वेळी ढवळे यांनी सांगितले की, चोरांचा शोध घेण्यासाठी चार पथके कार्यरत असून डॉग स्कॉडदेखील घटनास्थळी बोलावण्यात आले आहे.



## पनवेल परिसरातील दोन अपघातांमध्ये दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत दोन जणांचा मृत्यू झाला. कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या अपघातात मंगल बिजुराम चौधरी (वय ४५) या पादचाऱ्याचा मृत्यू झाला. या अपघातातील वाहनचालक अमोल कोळी (वय २९) हा कळंबोली सर्कलकडून गव्हाणकडे भरधाव वेगात कार चालवत असताना ट्रायसिटी, खांदा कॉलनी येथून रस्ता ओलांडणाऱ्या मंगल चौधरी याला त्याच्या कारने धडक दिली. या अपघातात चौधरी गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या घटनेत सायन-पनवेल महामार्गावर कळंबोली येथील उड्डाणपुलावर पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकीस्वार भरधाव वेगात जात असताना त्याच्या दुचाकीने विश्वनाथ भगत (वय ३०) व त्याची आई बालिका भगत (वय ५०) यांना जोराची धडक दिली.

या अपघातात हे दोघे गंभीर जखमी झाले. या दोघांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असता उपचारादरम्यान बालिका भगत यांचा मृत्यू झाला.

## गणेशोत्सवाच्या राज्य महोत्सवांतर्गत नवी मुंबईत भव्यतम कलागणेश महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निणर्यानुसार गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यात यावा असे जाहीर करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नानाविध उपक्रम राबविण्यात येत आहेत व त्यामध्ये लोकसहभागावर विशेष भर देण्यात येत आहे.

या दृष्टीने पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करावा असे नवी मुंबईकर नागरिकांना आवाहन करतांनाच पर्यावरण विषयक जाणीव जागृती करणारे देखावे उभारणाऱ्या व पर्यावरणपूरक साहित्याचा सजावटीमध्ये वापर करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन मिळावे व पर्यावरणाची जपणूक व्हावी याकरीता 'पर्यावरणपूरक प्लास्टिकमुक्त गणेश दर्शन स्पर्धा २०२५' आयोजित करण्यात आली आहे.

या सोबतच ६४ कलांचा अधिपती मानल्या जाणाऱ्या श्रीगणरायाचा उत्सव हा कला व संस्कृतीने संपन्न असावा यादृष्टीने बुधवार ३ सप्टेंबर २०२५ रोजी, सायं. ४.०० वाजता वाशी येथील विष्णुदास भावे नाटयगृह या ठिकाणी 'कलागणेश महोत्सव' हा भव्यतम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

यामध्ये 'सारेगमप संगीत स्पर्धा' विजेते सुप्रसिध्द गायक प्रथमेश लघाटे आणि मुग्धा वैशंपायन यांचा श्रीगणेश भक्तीगीतांचा सुरेल वाद्यवृंद आयोजित केला आहे. त्यासोबतच स्थानिक विद्यार्थी, युवक व महिला यांच्या नृत्याविष्काराचाही समावेश असणार आहे. त्याचप्रमाणे रंगमंचावर स्वराविष्कार सादर होताना श्रीगणेशाची प्रत्यक्ष मूर्ती साकारली जाणार आहे तसेच अक्षरांतून श्रीगणेशाची चित्राकृती रेखाटली जाणार आहे.

या महोत्सवामध्ये 'अक्षर गणेश' हे कलाकृतीचे नाविन्यपूर्ण प्रदर्शन आणि इतर कलात्मक साहित्याचे स्टॉल लावले जाणार आहेत. श्रीगणरायाची विविध कलाविष्कारांमधून आराधना करणाऱ्या या विशेष कार्यक्रमास विनामूल्य प्रवेश आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम व उपक्रमांच्या माध्यमातून नवी मुंबई क्षेत्रातील विविध क्षेत्रात कार्यरत संस्था, मान्यवर व्यक्ती, नागरिक यांच्याशी सुसंवाद वाढीवर भर देण्यात येत असून हा कार्यक्रम हा त्याच प्रयत्नांचा एक भाग आहे.

३ सप्टेंबर २०२५ रोजी विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी येथे सायं. ४.०० वाजता आयोजित 'कलागणेश महोत्सव' मध्ये प्रवेश विनामूल्य असून याची नोंद घेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्सवाचा आनंद वाढवावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## काळसेकर कॅम्पसच्या डी फार्मसी अभ्यासक्रमाला एक्सलंट ग्रेड

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-इ-इस्लाम काळसेकर टेक्निकल कॅम्पस (AIKTC), स्कूल ऑफ फार्मसीच्या डिप्लोमा इन फार्मसी अभ्यासक्रमाला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) कडून 'एक्सलंट ग्रेड' मिळाल्याची अभिमानास्पद कामगिरी साध्य झाली आहे.



हा सन्मान सातत्यपूर्ण शैक्षणिक प्रगती, समर्पित प्राध्यापकवर्ग, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कटिबद्ध प्रयत्नांचे फलित आहे. एक्सलंट ग्रेड ही एमएसबीटीई कडून दिली जाणारी सर्वोच्च मानांकनेपैकी एक असून, त्यामुळे AIKTC च्या गुणवत्तापूर्ण अध्यापन व विद्यार्थी-केंद्रित शिक्षणपद्धतीची प्रचिती येते.

गेल्या काही वर्षांत AIKTC मधील स्कूल ऑफ फार्मसीने अत्याधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण व अनुभवी प्राध्यापकवर्ग, तसेच सक्षम फार्मसी व्यावसायिक घडविण्याच्या दृष्टीकोनासह उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

या यशाचे श्रेय संस्थेच्या प्रभावी नेतृत्व व एकत्रित प्रयत्नांना जाते. यामध्ये अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष डॉ. झहीर आय. काझी (पद्मश्री २०२४); नवी मुंबई बोर्डाचे कार्यकारी अध्यक्ष बुरहान हॅरिस; कॅम्पस संचालक डॉ. रमजान खाटीक; स्कूल ऑफ फार्मसीचे डीन डॉ. शारिक सैय्यद; विभागप्रमुख डॉ. अबुसुफियान शेख; तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारीवर्ग यांचा मोलाचा वाटा आहे.

## मृतदेह आढळला

**पनवेल : परिसरात**

आढळला अनोळखी मृतदेह सापडला असून पनवेल शहर पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे.

पनवेल महानगर पालीकाचे पाठीमागे असलेल्या मैदानात एका अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला असून त्याचे वय ४५ वर्षे, डोक्यावर केस काळे व पांढरे, तोंड अर्धवट उघडे डोळे अर्धवट उघडे, दाढी पांढरी वाढलेली दिसत आहेत. बांधा मध्यम, उंची अंदाजे पाच फुट पाच इंच असा आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांझुर्णे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेलमध्ये पोलिसांकडून रूटमार्च

**पनवेल : वार्ताहर**


गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद या सणांच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रूटमार्चचे आयोजन करण्यात आले.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये हा रूटमार्च पनवेलमधील सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयापासून सुरू होऊन काळण समाज हॉल, पनवेल महानगरपालिका, मुसलमान नाका, टपाल नाका, कर्नाळा भाजी मार्केट सर्कल ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात आला. या रूट मार्चमध्ये पनवेल विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल शहर, खांदेश्वर आणि पनवेल तालुका पोलीस ठाण्यातील ७ पोलीस निरीक्षक, १० सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक तसेच ८३ पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला.

## मिलिंद खारपाटील यांची नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


पत्रकार उत्कर्ष समितीचे रायगड जिल्हाध्यक्ष मिलिंद खारपाटील यांची आगरी सेना पत्रकार संघ उरण तालुकाप्रमुखपदी नियुक्ती जिल्हाप्रमुख सचिन मते यांनी जाहीर केली.



मिलिंद खारपाटील सध्या आवाज महामुंबईचा युट्युब चॅनेलचे संपादक आहेत. त्यांनी आतापर्यंत २६ वेळा रक्तदान केले आहे. वृक्षारोपणामध्ये सक्रीय सहभाग घेतला आहे. न्हावा शेवा आंतरराष्ट्रीय कंटेनर टर्मिनलचा पहिला एम्प्लॉयी ऑफ द इयर हा सन्मान त्यांना मिळाला होता. विविध पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत.

### दुखवटा

## धर्माजी म्हात्रे



**पेण :** डोलवी गावचे ज्येष्ठ नागरिक सामाजिक कार्यकर्ते धर्माजी महादेव म्हात्रे (वय ९१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार भाऊ, एक बहीण, तीन मुलगे, दोन मुली, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. पेण तालुका आगरी समाज विकास मंचाच्या बांधकामात, डोलवी गावची आदर्श स्मशानभूमी, शाळा, मंदिरे, उभारण्यात, व डोलवी गावच्या विकासात त्यांचे मोठे योगदान आहे. कै. धर्माजी यांचा तेरावा गुरुवारी (दि.४) घरी डोलवी येथे होणार आहे.

## शांताराम गायकवाड



**मोहोपाडा :** शिवनगर मोहोपाडा येथील शांताराम लक्ष्मण गायकवाड (वय ८९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चयात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कै.शांताराम गायकवाड हे वारकरी संप्रदायातील जुने भजन सेवक म्हणून ओळखले जायचे.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे विसर्जनापूर्वी माजी जि.प. सदस्य तथा अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, गणेश कडू, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, निलेश खारकर, समीर ठाकूर, अमित नाईक, धीरज ओवळेकर, साईचरण म्हात्रे, छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, न्हावा न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य प्रमोद कोळी आदींनी दर्शन घेतले. सर्वांचे ठाकूर कुटुंबियांनी स्वागत केले.

## इनरव्हील क्लबतर्फे रक्तदान शिबिर

### ७७ जणांचे रक्तदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब पनवेल डिस्ट्रिक्ट ३१३च्या वतीने पनवेल रेल्वे स्टेशन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात ७७ रक्तदात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




केईएम ब्लड बँक, पनवेल रोटरी क्लब, कळंबोली रोटरी क्लब, गुरुकुल एज्युकेशन अँड कल्चरल ट्रस्ट आणि साई संस्कार स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन या सर्वांच्या सक्रिय सहकार्य व सहभागाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. समाजसेवेचा संदेश देणाऱ्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजसेवेचा संदेश देणाऱ्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून विविध स्तरांतून शिबिराचे कौतुक होत आहे.

महिलांच्या नेतृत्वाखाली कार्यरत इनरव्हील संस्था सातत्याने समाजहिताचे उपक्रम राबवत असून, हे रक्तदान शिबिर त्याचेच एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.




पनवेल : इनरव्हील क्लब पनवेलच्या सदस्यांनी तळोजा मध्यवर्ती कारागृहाला तेथील वाचलायनासाठी पुस्तके भेट दिली तसेच पोलीस व कैदी बांधवांना राखी बांधली. बंधूत्व आणि प्रेमाचा संदेश देत या उपक्रमातून कैद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. या वेळी कैद्यांना प्रबोधनात्मक माहिती देण्यात आली व त्यांच्या वाचनालयासाठी पुस्तके दान करण्यात आली.

# उरण शहरातील विमला तलावात पत्र्याची शेड बांधण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील विमला लवान गार्डन येथे दररोज सकाळी ७:३० ते ८:३० या वेळेत ज्येष्ठ नागरिक योगासने व व्यायाम करण्यासाठी मोठया प्रमाणात येत असतात. उन्हाळा हिवाळा पावसाळा कोणताही ऋतू किंवा कोणतेही सण उत्सव असले तरी हे ज्येष्ठ नागरिक न चूकता दररोज नियमीतपणे योगासने व व्यायाम करण्यासाठी एकत्र येत असतात. याशिवाय या गार्डन मधील मोकळ्या जागेत हे ज्येष्ठ नागरिक योगासने व व्यायाम करीत असतात.

उन्हाळ्यात ऊन असतांना तसेच पावसाळ्यात जोरदार पाऊस सुरु असतांनाही हे नागरिक त्याच ठिकाणी मोकळ्या जागेत उभे राहून व्यायाम व योगासने करीत असतात. उन्हाळ्यात व पावसाळ्यात या ज्येष्ठ नागरिकांना वेगवेगळ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामूळे ज्येष्ठ नागरिकांचे उन पाउस या पासून संरक्षण व्हावे.या दृष्टीने उरण विमला तलाव गार्डन मध्ये ज्येष्ठ नागरिक ज्या ठिकाणी व्यायाम व योगासने करतात.

या ठिकाणी पत्र्याचे मजबूत शेड बांधावे जेणेकरून जेष्ठ नागरिकांना उन्हाळ्यात उणापासून सावली मिळेल व पावसाळ्यात पाउसा पासून संरक्षण मिळेल अशी मागणी जेष्ठ नागरिकांनी केली आहे. उरण नगर परिषद प्रशासनाने जेष्ठ नागरिकांच्या मागणीचा विचार करून पत्र्याचे मजबूत शेड बांधावे.अशी मागणी उरणमधील जेष्ठ नागरिक यांच्यासह गार्डन मध्ये व्यायामासाठी येणारे युवा वर्ग, इतर नागरिकांनीही केली आहे. याबाबतीत उरण नगर परिषद लवकरच सकारात्मक प्रतिसाद देईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.





पनवेल : धरणा कॅम्प गावामध्ये गणेशोत्सवानिमित्त गावातील घरगुती गणपतींची स्थानिक तरुण एकत्रितरित्या आरती करतात. या वर्षीही सात दिवसांच्या गणपतींची सर्व दिवस आरती करण्यात आली. सोमवारी गौरी गणपती विसर्जनापूर्वीच्या आदल्या दिवशीची महाआरती सर्वेश संतोष पवार यांच्या घरात घेण्यात आली. या वेळी मोठ्या उत्साहात टाळ, ढोलकीच्या गजरात आरती झाली.

## पनवेल मनपा लोकशाही दिनात नागरिकांच्या तक्रारींचे निवारण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये १ सप्टेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले.



या बैठकित नागरी सेवा सुविधा विभागाचे दोन अर्ज दाखल झाले होते. या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.



पनवेल : भाजप युवा नेते शुभ पाटील यांच्या घरात विराजमान गणरायाचे महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी पाटील कुटुंबियांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.


## संपादकीय

# ऐतिहासिक निर्णय

मराठा आंदोलनाची हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याची मुख्य मागणी राज्य सरकारने मान्य केल्याने सरकारच्या निर्णयांविषयी समाधान व्यक्त करून मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील मंगळवारी संध्याकाळी छत्रपती संभाजीनगरला रवाना झाले. आंदोलनाच्या यशामुळे मराठा समाजाकडून आनंद साजरा केला गेला, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ऐतिहासिक निर्णयामुळे पेच सुटल्याबद्दल भाजप कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनीच मराठा समाजाचे हित जपणारा निर्णय घेतल्याची भावना सर्वत्र व्यक्त होते आहे.

**मराठा आरक्षणाच्या प्रश्नी मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाच्या मंगळवारच्या पाचव्या दिवशी सरकारने त्यांच्या काही मागण्या मान्य केल्याने त्यांनी उपोषण तर सोडलेच, शिवाय सरकारच्या निर्णयांविषयी समाधान व्यक्त करून लागलीच ते संभाजीनगरच्या दिशेने रवानादेखील झाले. हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याचा निर्णय सरकारने घेतल्याने आंदोलकांमध्ये मोठा जल्लोष झाला. मराठा समाजास कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात येणार असून त्यासाठी गावपातळीवर समित्या स्थापन करण्याबाबत शासननिर्णय जारी करण्यात आला आहे. गावपातळीवरील समितीमध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व सहायक कृषी अधिकारी यांचा समावेश असणार आहे. शासननिर्णयानुसार गावातील मराठा जातीच्या व्यक्तींना गावातील, कुळातील वा नातेवाईकांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास त्याबाबत तपासणी करून प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित आहे. याखेरीज सातारा गॅझेट व औंध गॅझेटची अंमलबजावणी करण्याबाबत कायदेशीर त्रुटी दूर करून निर्णय घेण्यात येईल. मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचीही जरांगे यांची मागणी होती. काही गुन्हे राज्य सरकारने यापूर्वीच मागे घेतले आहेत. उर्वरित गुन्हे न्यायालयात जाऊन मागे घ्यावे लागणार आहेत. मराठा आंदोलनात बळी गेलेल्या व्यक्तींच्या वारसांना तत्काळ मदत देण्यासाठी १५ कोटी रुपयांची मदत सरकारकडून देण्यात आली आहे. लवकरच ही मदत या कुटुंबियांच्या खात्यात जमा करण्यात येईल असेही जरांगेंनी सांगितले. याखेरीज मराठ्यांच्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतीत लावण्यात येणार आहेत. सरकारने समोर ठेवलेले प्रस्ताव जरांगे पाटील यांनी मान्य केल्यानंतर गेले पाच दिवस सुरू असलेले आंदोलन संपले. मराठा समाजाच्या हिताचा तोडगा मंत्रिमंडळ उपसमितीने काढला अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली व उपसमितीचे अभिनंदन केले. हैदराबाद गॅझेट लागू करण्याबाबत सरकारची सुरूवातीपासून तयारी होती, मात्र जरांगे पाटील यांची सरसकटची मागणी होती. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय पाहता सरसकटची मागणी पूर्ण करणे शक्य नव्हते. आपल्या कायद्याप्रमाणे आरक्षण हे समुहाला नसते तर ते व्यक्तीला असते. व्यक्तीने तशी मागणी करायची असते. जरांगे पाटील यांनी सरसकट विषयीची ही वस्तुस्थिती समजून घेतली तसेच त्यांच्या काही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. मंत्रिमंडळ उपसमितीचे शिष्टमंडळ यासाठी मंगळवारी दुपारी जरांगेंना भेटले. जरांगेंनी प्रस्तावाचा मसुदा वाचला व मागण्या मान्य झाल्याचे जाहीर केले. बहुतांशी मागण्या मान्य झाल्याने आंदोलकांमध्ये मोठा आनंद पसरल्याचे दिसून आले. मागण्या मान्य करूनच परतायचे अशा निर्धाराने मुंबईत आलेले मराठा आंदोलक मग लागलीच परतीच्या वाटेला लागले. अन्य कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही याची काळजी सरकारकडून घेतली जाईल याची ग्वाहीही देण्यात आली आहे. कुठलाही निर्णय कायद्याच्या चौकटीतला असला पाहिजे याबाबत सरकार आग्रही आहे हे योग्यच आहे.**

# शिवनेरी : महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय स्मृतिचिन्ह





सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेला शिवनेरी किल्ला केवळ एक किल्ला नसून महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय स्मृतिचिन्ह आहे, सोनेरी पान आहे. जुन्नर शहराच्या उत्तरेला उभा असलेला हा गड जणू त्या भूमीचा रक्षक बनून शतकानुशतके उभा आहे. इथला प्रत्येक दगड, प्रत्येक कडा, प्रत्येक तट इतिहासाची गाथा सांगतो.

इ.स. सहाव्या शतकापासून अस्तित्वात असलेला शिवनेरी किल्ला महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. सुरुवातीला हा किल्ला एक महत्त्वाचे लष्करी ठाणे म्हणून उभारण्यात आला होता. अनेक राजवटींनी या किल्ल्यावर आपले वर्चस्व गाजवले, मात्र भोसले घराण्याच्या काळात याला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

१५९५मध्ये मालोजीराजे भोसले यांच्या ताब्यात हा गड आला. याच ठिकाणी, १९ फेब्रुवारी १६३० रोजी युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. या किल्ल्याच्या साक्षीने त्यांचे बालपण घडले. ज्या किल्ल्यावर एका युगपुरुषाने पहिला श्वास घेतला, तो किल्ला स्वाभाविकच असामान्य तेज आणि पावित्र्य लाभलेला ठरतो. बालवयातच त्यांनी राज्यकारभार, युद्धकला आणि मुत्सद्देगिरीचे धडे येथेच गिरवले.

शिवनेरीचा निसर्गसंपन्न परिसर, मजबूत तटबंदी आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून केलेली रचना पाहिल्यास शहाजी राजांनी हा किल्ला निवडण्यामागचे महत्त्व लक्षात येते. शिवनेरीवर झालेल्या संस्कारांमुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली.

शिवनेरीचे महत्त्व केवळ त्याच्या संरक्षणात्मक रचनेत नाही तर त्याच्या सामरिक स्थानातही दडलेले आहे. नाणेघाट आणि माळशेज घाट या प्राचीन व्यापारी मार्गांवर नजर ठेवणाऱ्या या किल्ल्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांना व्यापारावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य होत असे. सातवाहनांच्या काळापासून या घाटखिंडी पश्चिम किनाऱ्यावरील समृद्ध बंदरांना देशाच्या आतील प्रदेशाशी जोडत होत्या. त्यामुळे या परिसरावर नियंत्रण म्हणजे व्यापार, सत्ता आणि सामरिक बळ या तिन्ही गोष्टींवर पकड मिळविणे होय. म्हणूनच पुढे कुठलाही राजवंश आला तरी शिवनेरीवर नियंत्रण मिळवणे हे त्यांच्यासाठी अनिवार्यच होते.

शिवनेरीची रचना ही युद्धकौशल्याचे अद्वितीय उदाहरण आहे. डोंगरकड्यांचे नैसर्गिक बळ आणि त्याला जोडलेली भक्कम चिरेबंदी, तटबंदी यामुळे हा किल्ला जवळपास अभेद्यच मानला जात असे. साधारणपणे साडेतीन हजार फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी सात दरवाजांमधून जावे लागते. हे दरवाजे वळणदार व गुंतागुंतीच्या पद्धतीने बांधलेले असल्यामुळे शत्रू गोंधळून जाई, त्याचा वेग मंदावला जाई आणि मग गडावरून हल्ला चढविणे सोपे होई.

किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर एक विस्तीर्ण पठार दिसते. त्यात निवासासाठी घरे, धान्यसाठ्याची कोठारे तसेच प्रस्तरात खोदलेली पाण्याची मोठी टाकी आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेत किंवा शत्रूच्या दीर्घकाळ चालणाऱ्या वेढ्यातही या पाणीसाठ्यामुळे गडाची स्वायत्तता टिकून राहायची. किल्ल्याच्या उत्तरेला 'कडेलोट' नावाचा उग्र कडा आहे, जिथून शत्रूंना खाली फेकले जात असे. किल्ल्याच्या आत शिवाई देवीचे मंदिर आहे. शिवनेरी हा केवळ सैन्यदृष्ट्या महत्त्वाचा गड नाही, तर धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्याही पूज्य मानला जातो.

आजही शिवनेरी महाराष्ट्राच्या लोकमानसात अपार आदराचे स्थान राखतो. दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हजारो शिवभक्त, शाळकरी मुले, इतिहासप्रेमी व पर्यटक या दिवशी गडावर एकत्र येतात. शिवनेरीचा गगनभेदी निनाद त्यांना धैर्य, शौर्य आणि स्वराज्याच्या विचारांनी प्रेरित करतो.

शिवनेरी किल्ल्याचा प्रवास केवळ ऐतिहासिक सफर नसून, त्याच्या आसपासच्या परिसरात अनेक अद्भुत ठिकाणे आहेत. इथे इतिहास, अध्यात्म आणि निसर्गसौंदर्य यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. किल्ल्यापासून अवघ्या पाच किलोमीटरवर लेण्याद्रीची लेणी आहेत. या प्राचीन बौद्ध लेणी उत्कृष्ट शिल्पकलेचे दर्शन घडवतात. याच गुहांमध्ये असलेले गिरीजात्मज मंदिर अष्टविनायकांपैकी एक असून, गणेशभक्तांसाठी हे पवित्र स्थळ आहे. गुहांपर्यंतच्या चढाईदरम्यान दिसणारे विस्तीर्ण निसर्गदृश्य मन मोहून टाकते.

शिवनेरीपासून दहा किलोमीटरवरील ओझर आणि गिरीजात्मज गणपती मंदिरे भक्तांसाठी विशेष आकर्षण आहेत. विघ्नहर गणेशाला समर्पित असलेले ओझर मंदिर देखण्या वास्तू कलेसाठी प्रसिद्ध आहे. इथले शांत आणि भक्तिमय वातावरण प्रार्थनेसाठी पोषक आहे. निसर्ग प्रेमींसाठी माळशेज घाट हे रमणीय स्थळ शिवनेरीपासून तीस किलोमीटरवर आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, धबधबे आणि जैव विविधतेने नटलेला परिसर इथे पाहायला मिळतो. पावसाळ्यात तर हा संपूर्ण प्रदेश हिरव्यागार शालूत नटतो. साहस प्रेमींनी नाणेघाटाला भेट द्यायलाचं हवी. हा प्राचीन व्यापारी मार्ग आणि ट्रेकिंगचे प्रसिद्ध ठिकाण ३५ किलोमीटरवर आहे. इथल्या कोरीव शिला लेखांमधून शतकांपूर्वीच्या व्यापाऱ्यांच्या आठवणी जपल्या गेल्या आहेत. नाणेघाटातून सह्याद्री पर्वतरांगांचे विस्मयकारक दृश्य दिसते. केवळ सहा किलोमीटरवर जुन्नरची लेणी आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी कोरलेल्या या बौद्ध लेण्यांमध्ये चैत्यगृह आणि विहारांचा समावेश आहे. कोरीव नक्षीकाम, प्राचीन काळातील भिक्षूंचे वास्तव्य आणि शिल्पकला यामुळे हे ठिकाण विशेष आहे. इतिहास, अध्यात्म आणि निसर्ग यांचा सुंदर मिलाफ असलेल्या शिवनेरी आणि त्याच्या आजूबाजूच्या ठिकाणांना भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरतो.

'युनेस्को'च्या जागतिक वारसा मानांकन यादीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, शिवनेरीलाही त्या सन्माननीय श्रेणीमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे शिवनेरीला जागतिक स्तरावरही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

खरेतर शिवनेरी हा केवळ दगड आणि मातीचा किल्ला नाही तर तो धैर्याचा स्रोत, चारित्र्याचा आधार आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहे. शिवनेरी किल्ला हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून महाराष्ट्राच्या अभिमान, शौर्य आणि परंपरेचे प्रतीक आहे. इतिहासप्रेमी, ट्रेकिंगसाठी उत्सुक किंवा संस्कृतीचा अभ्यास करणारे पर्यटक इथे एक अद्वितीय अनुभव घेऊ शकतात. किल्ल्याच्या भव्यतेचा अनुभव घेत असताना, त्या महान युगाचा साक्षीदार होण्याची संधी लाभते, ज्या काळाने भारताच्या भवितव्याला आकार दिला. इथल्या सुळक्यांवर उभे राहून सह्याद्रीच्या विस्तीर्ण रांगांचे सौंदर्य डोळ्यांत साठवता येते. शिवनेरीचा प्रत्येक दगड, प्रत्येक तटबंदी आणि प्रत्येक वाट इतिहासाचे सोनेरी पान उलगडते.

**–संजय डी.ओरके, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**

## बदलते तंत्रज्ञान

# इंटरनेटशिवाय चालणार नवे बिटचॅट ॲप!




जगभरात सर्वाधिक वापरला जाणारा व्हॉट्सॲप आता एका नव्या ॲपसमोर मोठ्या आव्हानात सापडू शकतो, कारण ट्विटर (आता एक्स) चे सहसंस्थापक जॅक डोर्सी बाजारात एक भन्नाट इन्स्टंट मेसेजिंग ॲप घेऊन येत आहेत. या ॲपचं नाव आहे बिटचॅट आणि त्याची सर्वात मोठी खासियत म्हणजे हे ॲप इंटरनेटशिवायसुद्धा काम करतं.

बिटचॅट मेसेजिंगसाठी ब्लूटूथ मेश नेटवर्कचा वापर करतं, म्हणजेच इंटरनेट नसलं तरीही तुम्ही आपल्या मित्र-परिवाराशी जोडलेले राहू शकता. हा कम्युनिकेशनचा एक अनोखा प्रकार आहे, जो हाय-टेक एन्क्रिप्शन अंतर्गत पूर्ण सुरक्षित असेल. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या ॲपमधून मेसेजेस जवळपास ३०० मीटरच्या परिसरात ट्रान्समिट केले जाऊ शकतात, तर साधारण ब्लूटूथची मर्यादा फक्त १०० मीटर असते.

यात तुम्ही Twitterप्रमाणेच mention टाकू शकता, वेगवेगळ्या टॉपिक-बेस्ड चॅटरूम्स तयार करू शकता आणि आवडलेले मेसेजेस Favourites मध्ये जतनही करू शकता. डोर्सी यांनी याचा Testflight वर्जन Apple युजर्ससाठी आधीच उपलब्ध करून दिलं आहे.

बिटचॅट इंटरनेटवर अवलंबून नसल्यामुळे तुमच्या डेटाचा गैरवापर होण्याची भीतीच नाही, कारण सर्व्हरवर कोणतीही माहिती साठवली जात नाही. व्हॉट्सॲपप्रमाणे ॲड्स, चॅनेल्स किंवा इतर व्यावसायिक ॲक्टिव्हिटी इथे नाहीत, त्यामुळे युजर्सना खऱ्या अर्थाने प्रायव्हसी मिळेल असं मानलं जातं.

डोर्सी सतत नवे प्रयोग करत आहेत. त्यांनी आधी Bluesky नावाचं मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म आणलं, तसेच ते Bitcoin आणि Decentralized Technologyला नेहमीच सपोर्ट करत आहेत. आता Bitchatच्या माध्यमातून ते पुन्हा एकदा युजर्सना नवा अनुभव देणार आहेत.

सध्या हे ॲप बीटा टेस्टिंग स्टेजमध्ये आहे आणि केवळ काही ळजड युजर्ससाठी TestFlightवर उपलब्ध आहे. लॉंच होताच १०,००० युजर्सची मर्यादा क्षणात पूर्ण झाली.

जॅक डोर्सी यांनी याचे व्हाईटपेपर व बीटा इनवाइट्स एक्स (पूर्वी ट्विटर)वर शेअर केले आहेत. अधिकृत लॉंच डेट अद्याप जाहीर झालेली नाही, पण Android व्हर्जनवर काम सुरू आहे. म्हणजेच, भविष्यात इंटरनेटशिवाय मेसेजिंगचा नवा क्रांतिकारी अध्याय सुरू होणार आहे.

# लोकनाट्य कलाकार शाहीर साबळे



## निमित्त

शाहीर साबळे हे ख्यातकीर्त मराठी शाहीर व लोकनाट्य कलाकार. त्यांचे पूर्ण नाव कृष्णराव गणपतराव साबळे, परंतु शाहीर साबळे या नावानेच ते परिचित राहिले. त्यांचा जन्म ३ सप्टेंबर १९२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पसरणी (ता. वाई) येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील माळकरी होते. वारकरी पंथाचे भजन-कीर्तन ते करीत असत. आई निरक्षर, पण जात्यावर दळताना ओव्या रचणारी व गाणारी होती. त्यामुळे गायकीचा वारसा शाहिरांना आई-वडिलांकडून मिळाला. गावच्या भजनी मंडळात ते गात असत. बालवयात त्यांना बासरीवादनाचाही छंद जडला. सुरुवातीचे शिक्षण जन्मगावी घेऊन पुढे ते त्यांच्या मामांकडे अमळनेरला गेले. तेथे सातवीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर त्यांनी शाळा सोडली, मात्र अमळनेरला त्यांना साने गुरुजींचा सहवास लाभला.


गुरुजींकडून प्रखर राष्ट्रवाद आणि निर्व्याज देशभक्तीचे बाळकडू त्यांनी आत्मसात केले. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत जनजागृती करण्यासाठी गुरुजींबरोबर ते दौरे करू लागले तसेच राजकीय-सामाजिक अपप्रवृत्तींवर प्रहार करण्यासाठी शाहिरी माध्यमाचा उपयोग करून घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. पुढे जागृती शाहीर मंडळ त्यांनी काढले. धुळ्याचे शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे यांचा आदर्श त्यांनी स्वतःसमोर ठेवला होता. पुढे १९४२ साली शाहीर शंकरराव निकम यांच्या प्रभावाखाली ते आले. निकमांकडूनच त्यांनी शाहिरी कलेचे प्रत्यक्ष धडे घेतले. हैदराबाद मुक्तिसंग्रामातही त्यांनी प्रचाराचे रान उठवले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी 'जातीयवाद की समाजवाद' (१९४७) हा पहिला पोवाडा लिहिला. स्वतंत्र भारतात नव्याने सुरू झालेल्या राजकारणाचा संदर्भ या पोवाड्याला होता. त्यांचा विशेष उल्लेखनीय पोवाडा म्हणजे आधुनिक मानवाची कहाणी.

स्वातंत्र्योत्तर काळात पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश द्यावा, म्हणून साने गुरुजींनी प्राणांतिक उपोषण आरंभिले होते. त्या वेळी शाहिरांनी आपल्या पथकासह या मंदिर प्रवेशासाठी महाराष्ट्रभर प्रचार करून अनुकूल वातावरण निर्माण केले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवामुक्ती आंदोलन यांतही जनजागृतीसाठी त्यांनी प्रभावी शाहिराची भूमिका बजावली. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर कवी राजा बढे यांनी रचलेले आणि श्रीनिवास खळे यांनी संगीतबद्ध केलेले गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत शाहिरांनी गायिले.

आंधळं दळतंय पूर्वी त्यांनी अनेक प्रहसने रंगभूमीवर आणली होती. त्याचप्रमाणे यमराज्यात एक रात्र या मुक्तनाट्याचा बंदिस्त नाट्यगृहात प्रयोग करून (१६ जानेवारी १९६०) व्यावसायिक रंगभूमीवर त्यांनी पहिले पाऊल टाकले. त्यानंतर माकडाला चढली भांग (१९६९, चिं. त्र्यं. खानोलकर), शेतात मोती, हातात माती (१९६९), फुटपायरीचा सम्राट (१९७०, विजय तेंडुलकर ), एक तमाशा सुंदरसा (१९७१, सई परांजपे), कोंडू हवालदार (१९७६, पां. तु. पाटणकर) यांसारखी मुक्तनाट्ये सादर केली. त्यांची एकूण १४ मुक्तनाट्ये असून त्यांतील नऊ त्यांनी, तर पाच इतर लेखकांनी लिहिली आहेत. शाहिरांनी त्यांच्या सर्व मुक्तनाट्यांतून समाजप्रबोधनाला योग्य असे विषय प्रभावीपणे सादर केले. अशा या महान शाहिराचे २० मार्च २०१५ रोजी निधन झाले.

शाहीर साबळे यांना अनेक पुरस्कार, मान-सन्मान प्राप्त झाले, तर त्यांच्या नावाने मुंबई भाजपच्या वतीने शाहीर साबळे स्मृती गौरव पुरस्कार देण्यात येतो. पहिल्या वर्षी हा पुरस्कार पार्श्वगायक रवींद्र साठे यांना मिळाला होता. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## तुळशीचे पान म्हणजे आरोग्यासाठी वरदानच!



तुळस ही पवित्र मानली जाणारी वनस्पती आहे. ती फक्त धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाची नाही, तर त्याचे अनेक औषधी फायदेही आहेत. तुळशीच्या पानांत जंतूनाशक, विषाणूनाशक, दाहशामक, अँण्टी ऑक्सिडंट्स आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे गुण असतात. त्यामुळे तुळस खाणे आणि तुळस त्वचेवर लावणे दोन्ही कृती फायद्याच्या ठरतात.

तुळशीच्या पानांचा लेप त्वचेवरील विकारांवर खास परिणामकारक मानला जातो. त्वचेवर वारंवार येणारे फोड, पुरळ, खाज किंवा किड्यांमुळे होणारी ॲलर्जी यावर तुळशीची पाने लावणे एकदम प्रभावी ठरते. ही पाने वाटून लावल्यास सूज कमी होते आणि त्वचेला थंडावा मिळतो. जखमा लवकर भरव्या आणि त्यावर संसर्ग होऊ नये यासाठीही तुळशीचा लेप उपयुक्त आहे. उन्हामुळे त्वचा लालसर झाली असेल किंवा ॲलर्जीमुळे त्रास होत असेल तर तुळशीच्या पानांचा लेप लावल्याने आराम मिळतो.


तुळशीच्या पानांचा काढा हा घरगुती औषधांमध्ये सर्वात प्रभावी मानला जातो. सर्दी, खोकला, ताप, घशाची खवखव यांसाठी तुळशीचा काढा घेतल्यास लवकर बरे वाटते. श्वसनमार्गातील अडथळे दूर करण्याची क्षमता तुळशीमध्ये असल्याने दमा किंवा श्वसनासंबंधी समस्या असणाऱ्यांसाठी हा काढा उपयुक्त ठरतो. पचनशक्ती कमी असलेल्यांनी तुळशीचा काढा घेतल्यास भूक सुधारते आणि पचनाचे त्रास कमी होतात. शरीराला उब मिळावी यासाठी तुळशी, आलं, काळी मिरी असा काढा घेतला जातो.

तुळशीचे आणखी काही महत्त्वाचे फायदे म्हणजे ती रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते. सतत बदलत्या हवामानात किंवा वारंवार आजारी पडणाऱ्यांनी तुळशीचा नियमित वापर केला तर शरीराला आजारांशी लढण्याची ताकद मिळते. तुळशीतील अँण्टी ऑक्सिडंट्स शरीरातील हानिकारक मुक्त रॅडिकल्सचा नाश करतात आणि पेशींचे रक्षण करतात.

याशिवाय तुळशी रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते, कोलेस्टेरॉल कमी करण्यास उपयोगी ठरते आणि हृदयाचे आरोग्य चांगले राखते. पोटदुखी, डोकेदुखी किंवा मासिक पाळीतील वेदना कमी करण्यासाठीही तुळशीचा उपयोग केला जातो. तिच्या सुगंधामुळे वातावरण शुद्ध होते आणि मनाला प्रसन्नता मिळते.



गायक जगदीश भोईर, नागाव, उरण



पनवेल : रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे नोडलश कर्मचारी दिलीप पाटील यांच्या घरच्या गणपतीचे गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांनी दर्शन घेतले.



पेण : पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा साप्ताहिक रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील यांनी पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांच्या रावे येथील घरी जाऊन त्यांच्या गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, ॲड. प्रशांत पाटील, सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील, रामचंद्र पाटील, प्रभूराम पाटील उपस्थित होते.



मुरुड : कोळीवाडा परिसरातील रवी साखरकर व किरण साखरकर यांच्या निवासस्थानी विराजमान मूर्ती.



उरण : गोवठणे गावातील सामाजिक कार्यकर्ते प्रेमनाथ म्हात्रे यांच्या घरी विराजमान झालेल्या गणेशमूर्तीचे श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, उपाध्यक्ष हेमंत पवार तसेच प्रकाशभाऊ यांनी दर्शन घेतले.



सविता साळुंखे, खांदा कॉलनी यांच्या घरी स्थापित गौरी



ज्ञानेश्वर माळी, वावेघर



पनवेल : महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या घरी विराजमान गौरीचे माजी जि.प.सदस्य अमित जाधव आणि माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील यांनी दर्शन घेतले.

# 'ग्रामीण भागातील कविसंमेलने कोमसापच्या उपक्रमांना बळ देणारी'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण भागातील कवी संमेलने कोकण मराठी साहित्य परिषदेच्या उपक्रमांना बळ देणारी असल्याचे मत कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्क प्रमुख रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी अलिबाग येथे उरण कोमसापतर्फे आयोजित केलेल्या कवी संमेलनाच्यावेळी व्यक्त केले.

अलिबाग तालुक्यातील भाकरवड येथे गणोत्सवानिमित्त झालेल्या कवी संमेलनास रायगड जिल्हा कोमसापचे अध्यक्ष संजय गुंजाळ, केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी, ज्येष्ठ कीर्तनकार प्रवचनकार ह.भ.प. जगन्नाथ राऊत, मनस्वी मानव सेवा अध्यक्ष जीवन पाटील, उरण कोमसापचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, इंडिया झिंदाबाद फ्रेंड्स ग्रुप रायगडचे कार्याध्यक्ष रमेश थवई आदी उपस्थित होते.

या वेळी कोमसापचे अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी आपल्या भाषणात, रायगड जिल्ह्यात अधिकाधिक साहित्य उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त करत गणेशोत्सव म्हटलं की, आज वेगवेगळ्या पद्धतीने मनोरंजन केले जात आहे परंतु उरण कोमसाप शाखेने साहित्यिक,कवींसाठी आयोजित केलेल्या कवी संमेलनाचे कौतुक केले.

या कवी संमेलनात अनिल भोईर, रमेश थवई, अजय शिवकर, मोहनलाल पाटील, दिलीप पाटील, नरेश पाटील, अनुज शिवकर, महेंद्र पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, गौरीश पाटील, मोहन पाटील, केशव म्हात्रे, दिपक गावंड आदींनी आपल्या वेगवेगळ्या विषयांवरच्या कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे आयोजन नरेश पाटील यांनी केले होते. नवनिर्वाचित रायगड जिल्हा कोमसापचे अध्यक्ष संजय गुंजाळ, केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी यांचा आयोजकांतर्फे सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कोमसाप उरण शाखेचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले.



# माथेरानमध्ये गणपती आणि गौराईला निरोप

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये मंगळवारी गणपती बरोबर गौराईलाही भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. सहा दिवस अभ्यंग, पंचामृत, धूप, दीप, मोदकांचा नैवेद्य असा भक्तांचा पाहुणचार घेऊन श्रीगणेशाने निरोप घेतला.

बॅन्जोच्या तालावर थिरकत सर्व गणेश भक्तांनी नाचत आणि गणपती बाप्पा मोरया पुढल्यावर्षी लवकर या असा जयघोष करत गौरी गणपतींना संपूर्ण भक्तीमय वातावरणात निरोप दिला. येथील गणेश घाट (बालदी) याठिकाणी गौरी-गणपतींचे विसर्जन करण्यात आले.

माथेरान शहरात पाच दिवसांचे एकूण ६१ गणपती बाप्पा विराजमान होते. तसेच गौरी विसर्जन या वेळी असल्याने मोठी गर्दी पहावयास मिळत होती. ढोल ताशा आणि बॅन्जोच्या तालावर मिरवणुकीत थिरकत गणेशभक्त फटाक्यांची अतिषबाजी करताना दिसत होते. ढोल ताश्यांच्या गजरात संपूर्ण माथेरान नगरी दुमदुमली होती. याशिवाय विसर्जनस्थळी होणाऱ्या आरत्यांनी परिसर दुमदुमून गेला होता. येथे कुठलाही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

विसर्जनस्थळी नगर पालिका कर्मचारीदेखील हजर होते. उत्साही तसेच आनंदी वातावरणात गौरींचे आणि गणपतीमूर्तींचे विसर्जन यावेळी केले जात होते. मिरवणुकीत महिला वर्गाची संख्या लक्षणीय होती. गणेशभक्तांनी सहकार्य केल्यामुळे विसर्जन सोहळा अगदी शांततेत आणि उत्साही व आनंदी वातावरणात पार पडला

# खोपोली-खालापुरात गौरी गणपतींचे विसर्जन

**खोपोली : प्रतिनिधी**

गणपती उत्सवाचा महत्वाचा टप्पा मंगळवारी संमाप्त झाला. सात दिवस मोठ्या भक्तिमय वातावरणात गणपती व गौरीमातेची यथासांग भक्ती करून मंगळवारी खालापूर-खोपोलीत गौरी व गणपतीचे विसर्जन करून गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशी आर्त हाक देत बाप्पाला उत्साही वातावरणात निरोप देण्यात आला.

हजारो घरगुती व बहुसंख्य सार्वजनिक गणपती बाप्पाचे विसर्जन आकर्षक मिरवणुका, ढोल-तासेचा खणखणट, उत्साह आणणारे संगीताच्या तालावर वाजत-गाजत मिरवणुका सोबत प्रचंड जल्लोषात मंगळवारी पार पडले. या वेळी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. खोपोली नगरपालिकाकडून प्रथेप्रमाणे याही वर्षी गणपती विसर्जन मिरवणुकांचे स्वागत करण्यात आले. या वेळी माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, कुलदीपक शेंडे, डॉ सुनिल पाटील, मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील, सर्व पक्षाचे गटनेते, माजी नगरसेवक नगरसेविका, वरिष्ठ पोलीस निरिक्षक सचिन हिरे आदी उपस्थितीत होते. खोपोलीतील हायको कार्नर मार्गे निघालेल्या विसर्जन मिरवणुका बाजारपेठ मधून शंकर मंदिर तळ्यापर्यंत ऐका पाठोपाठ जात होत्या.

विसर्जन मिरवणुकांत कोणताही गैरप्रकार होऊ नये व कायदा सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. खालापुरातही पारंपारिक पद्धतीने डोक्यांवर गणपती बाप्पा घेऊन गावा गावातून एकत्रित पणे मिरवणूक काढून मोठ्या जल्लोशात गौरी व गणपती बाप्पाचे विसर्जन संपन्न झाले.




**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-पाले बुद्रुक, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णण-**

**मौजेः पाले बुद्रुक, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे-पाले बुद्रुक, ता. पनवेल | बॉम्बे आयटी प्रा.ली. | १५/९/अ/२ | १.१२.०० ०.००.०० १.१२.०० | २.९६ |
| | | १५/१९ | ०.०४.०० ०.००.०० ०.०४.०० | ०.०९ |
| | | ४४/४ | ०.४०.१० ०.०३.५० ०.४३.६० | ८.४५ |
| | | ४४/५ | ०.०४.३० ०.००.८० ०.०५.१० | ०.८१ |
| | | १०१/१ | ०.२५.९० ०.०२.०० ०.२७.९० | ५.२५ |
| | | ८३/१ | ०.२२.०० ०.००.०० ०.२२.०० | १.१९ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**

**दिनांक: /०९/२०२५**

**सही/-**

**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**

**पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६ मो. क्र. ९६९९४९९९६३**


# गणेशोत्सव काळात केवड्याची अधिक विक्री

**पाली : प्रतिनिधी**

गणपती बाप्पाला दुर्वा व जास्वंदीचे फुले जसे आवडते, तसेच केवड्याचा सुवासदेखील आवडतो. त्यामुळेच गणेशोत्सवात गणपती बाप्पाला अनेकजण केवड्याची पातदेखील वाहतात. त्यामुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी केवडा विक्रीसाठी आलेला असून केवड्याला प्रचंड मागणी आहे. बाजारात सध्या केवड्याचे एक पाते दहा रुपयाला मिळत आहे.

रायगड जिल्ह्याला विस्तृत समुद्रकिनारा लाभला आहे. आणि या समुद्रकिनाऱ्याच्या शेजारी केवड्याची वने आहेत. सद्यस्थितीत या केवड्याची वनांची संख्या कमी होत असली तरी अजूनही केवड्याची वने शिल्लक आहेत. श्रीवर्धन, दिवेआगर, रेवदंडा, मुरुड, अलिबाग आदी समुद्रकिनारी केवड्याची वने पाहायला मिळतात. या केवड्याच्या वनातून



**आदिवासींना रोजगार उपलब्ध**

जाताना केवड्याच्या पात्यांचा सुवास मन प्रसन्न करून टाकतो. एरवी या केवड्याला फारसे महत्त्व नसते. गजऱ्यामध्ये किंवा वेणीमध्ये काही प्रमाणात केवडा वापरला जातो, मात्र त्याचे प्रमाण हे कमी आहे, मात्र गणेशोत्सवात या केवड्याला खूप महत्त्व प्राप्त होते.

गणरायाच्या मूर्ती शेजारी तसेच गौरीच्या इथेदेखील केवड्याची पात ठेवली जाते. गणपतीला दुर्वा, जास्वंद फूल व केवडा वाहिला जातो. तर गौरीला मोगऱ्याची फणी, गजरा व केवडा वाहिला जातो. अनेक महिला केवड्याची पाती घेऊन विक्रीसाठी येत आहेत. त्यामुळे त्यांनाही रोजगार मिळत आहे.

**बहुपयोगी केवडा**

केवडा ही बहुउपयोगी वनस्पती असून पूजा संसाधना बरोबरच सुगंधी औषधी, अगरबत्ती व इतर उत्पादनासाठी केवड्याचा उपयोग होतो. फुलांचा वापर केवडा अत्तर, केवडा तेल व केवडा पाणी यासाठी करतात. केवड्याच्या पाण्याचा वापर विविध प्रकारांच्या मिठायांत केला जातो. सरबते तयार करण्यासाठी देखील केवडा पाण्याचा वापर केला जातो. केवडा तेलाचा वापर पान मसाल्यात, जर्दा तसेच उच्च प्रतीच्या सौंदर्यप्रसाधनात केला जातो.

# *कोयना जांब्रुक वावंढळ येथील गौरी गणपतींना भावपूर्ण निरोप*

**चौक : प्रतिनिधी**

कोयना जांब्रुक वावंढळ व परिसरातील सात दिवसांच्या गणरायांना गौरी मातेसह निरोप देण्यात आला.

कोयना जांब्रुक वावंढळ या गावाला ६७ वर्षांची परंपरा लाभली आहे. आज ग्राम दैवत यांना मानकरी यांच्याकडून पुन्हा मंदिरात स्थानापन्न केल्यानंतर घरोघरी आरती झाल्यावर सर्व घरातील गौरी गणपती यांना वाजत गाजत निघाल्या. या वेळी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या, गणपती गेले गावाला चैन पडेना आम्हला अशी आर्गात हाक देण्यात येत होत्या.

गावच्या सीमेवर असलेल्या नदीवर भावपूर्ण निरोप देण्यात आला. या वेळी अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या.




**ड्रायव्हर पाहिजे**

**फॉर्च्युनर कारसाठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई-४१०२०६

संपर्क

मोबाईल : ८९१०८४००२१४

Email : ekanathpatil4141@gmail.com

# गणेशोत्सवात रक्तदान शिबिर

## कर्जतच्या नवतरुण ओंकार मित्र मंडळाचा उपक्रम

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील दहिवली येथील नवतरुण ओंकार मित्र मंडळाने माया रक्त केंद्र बदलापूरच्या सहकार्याने सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले. मंडळाचे विजय जिनगरे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून शिबिराचा शुभारंभ केला.

या वेळी मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे, उपाध्यक्ष प्रशांत वारीक, विजय जिनगरे, प्रकाश पातेरे, सचिन मनवे, पराग कोगजे, ओंकार जिनगरे, राज जाधव, नरेश सुर्वे, अमिर मणियार, किरण कांबळे, जयवंत म्हसे, डॉ. प्रशांत सदावर्ते, कैलास पोटे, अमेय शेटे, विवेक मोरे, कल्पेश जाधव, अक्षय कदम, अभिजित कदम, राहुल पातेरे, हर्षल मोरे, निशान मोरे, ऋषी मोरे, कल्पेश मोरे, जितेंद्र अधिकारी, परेश मोरे, तेजस देशमुख, आकाश देशमुख आदी उपस्थित होते.



## चौकमध्ये वैद्यकीय शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

आदर्श मित्र मंडळ कोल्हापूर पेठ, चौक (ता. खालापूर) यांच्या सुवर्ण महोत्सव गणेशोत्सव साजरा करताना वैद्यकीय शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



खालापूर तालुक्यातील सर्वात मोठे सार्वजनिक मंडळ म्हणून चौक या ऐतिहासिक गावातील आदर्श मित्र मंडळ कोल्हापूर पेठ, चौक यांचा उल्लेख होतो. मंडळाकडून गेली ५० वर्षे सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. मंडळाचे अध्यक्ष नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

शंकरा आय हॉस्पिटलच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी करण्यात येऊन डोळ्यांची शस्त्रक्रिया आवश्यक असणाऱ्या रुग्णांना पनवेल येथे नेण्यात आले. तेथे त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे, तर एमजीएम हॉस्पिटलच्या वतीने आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. यंदाचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.

## एनएमएमटीच्या फेऱ्या वाढवाव्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात नवनवीन कारखानदारी येत असल्यामुळे या ठिकाणी कामानिमित्त मुंबई, नवी मुंबई, पनवेल, बेलापूर येथून प्रवासी ये-जा करत असतात. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन विभागाने रसायनी (वाशिवली) एनएमएमटी बससेवा संध्याकाळच्या वेळेस तासाला सुरू करावी, अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

कोरोना काळात नवी मुंबई महापालिकेने प्रवाशांचा वाढता कल लक्षात घेता रसायनी (वाशिवली) ते सीबीडी बेलापूर अशी बससेवा सुरू केली, परंतु ही बससेवेचे सुव्यवस्थित टाईमटेबल नसल्यामुळे रसायनी विभागात कमी फेऱ्या होतात. त्यामुळे प्रवासीवर्गाची गैरसोय होत आहे. संध्याकाळी बेलापूर येथून ४ ते ५ वाजण्याच्या दरम्यान रसायनीकडे एकही एनएमएमटी बस नसल्याने प्रवासी अडकून पडत आहेत. शिवाय रसायनीकडे येणाऱ्या एनएमएमटीची बस रस्त्यावर कोठेना कोठे बंद पडल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे प्रवासी वर्गाला दुसरी बस येईपर्यंत ताटकळत बसावे लागत आहे व कामाच्या ठिकाणी व घरी पोहचण्यास उशीर होतो.

## मराठा आंदोलक माथेरान पर्यटनस्थळी

**माथेरान : प्रतिनिधी**

मराठा आरक्षण मिळविण्यासाठी मनोज जरांगे-पाटील मुंबईत मोठ्या संख्येने आंदोलकांसह दाखल झाले होते. आझाद मैदानात त्यांचे आमरण उपोषण सुरू असताना काही आंदोलकांनी माथेरान या थंड हवेच्या पर्यटनस्थळी हजेरी लावली.

मराठा आंदोलकांच्या खाण्या-पिण्याच्या व्यवस्थेचा संपूर्ण राज्यातून मराठा समाज बांधवाकडून मदतीचा ओघ मुंबईकडे रवाना झाल्याचे चित्रदेखील समोर आले आहे. दरम्यान, आंदोलकांमुळे मुंबई जाम व मुंबईकरांना त्रास होत असल्याने जरांगे पाटील यांनी आंदोलकांना पोलिसांना सहकार्य व मुंबईबाहेर नवी मुंबई, पनवेल आदी भागात जाण्याचे आवाहन केले.

परभणी जिल्ह्यातून तब्बल दोन लाखांपेक्षा अधिक मराठा समाज बांधव आंदोलनात सहभागी झाले होते. यापैकी काही मराठा समाज बांधव कर्जतमध्ये दाखल झाले. यातील काहींनी थेट जगप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण माथेरान येथेही हजेरी लावली. या वेळी या आंदोलकांनी आम्ही कधीही माथेरान पाहिले नव्हते, म्हणून इथं आलो आहोत, मात्र मागण्या मान्य झाल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा निर्धार व्यक्त केला.



# श्रीवर्धनमध्ये पर्यावरणपूरक गणेश आरास स्पर्धा; विजेत्यांना बक्षीस

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात दरवर्षी उत्साहात पार पडणारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयोजित पर्यावरणपूरक गणेश आरास स्पर्धा या वर्षीदेखील मोठ्या जल्लोषात झाली. पर्यावरणाचे जतन आणि मराठी संस्कृतीचा गौरव यांचा सुंदर मिलाफ असलेल्या या उपक्रमाला शहरातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण २९ स्पर्धकांनी विविध नवनवीन संकल्पनांवर आधारित, पर्यावरणपूरक सजावट साकारत स्पर्धेत भाग घेतला. नव्या पिढीकडूनही मराठी परंपरा जपत आधुनिकतेला स्पर्श करणारे आकर्षक उपक्रम मांडण्यात आले.

स्पर्धेत प्रथम क्रमांक अभय सातम (गणेश आळी), द्वितीय क्रमांक देवकीनंदन रघुवीर (जीवना बंदर), तृतीय क्रमांक अनंत गुरव (जीवनेश्वर आळी), तर उत्तेजनार्थ बक्षीस सिद्धेश नरवणकर (श्रीवर्धन दांडा) व मयुरेश कौलकर (नारायण पाखड) यांनी बक्षीस मिळवले. स्पर्धेच्या पारदर्शकतेसाठी खास निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. विजेत्या स्पर्धकांना त्यांच्या घरी जाऊन प्रशस्तीपत्रक, चषक व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान माजी नगराध्यक्ष जितेंद्र सातनाक, माजी नगरसेवक बाळकृष्ण चाचले, सुनील पवार, दिनेश नागवेकर, देवेश पवार, अर्चित पोलेकर, स्वराज सातनाक व भावेश मांजरेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

या स्पर्धेमुळे श्रीवर्धनकरांनी पुन्हा एकदा दाखवून दिले की, पर्यावरण संवर्धन आणि संस्कृती जपण्याचा उत्सव आनंदोत्सवाइतकाच महत्त्वाचा आहे.



# मकू कुटुंबियांचा संस्कृतीरक्षक गणेश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील शिवाजीनगर कोळीवाड्यातील जितेंद्र मकू यांच्या घरी दहा दिवसांच्या गणरायाचे आगमन झाले असून संस्कृती जतन करणारा श्री गणेश अशी याची परिसरात पूर्वापार ख्याती आहे. गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ येथे गणरायाचे आगमन होते. दरवर्षी विविध प्रकारच्या आरासीमधून समाजप्रबोधन करणारा गणेश मुरूड व परिसरातील भाविकांच्या श्रद्धा आणि आकर्षणाचा विषय ठरला आहे.



यंदा मकू कुटुंबियांनी समाजातील चालू घडामोडी नेमकेपणाने हेरून त्यातून शिकवण देत मनोरंजनातून लोकप्रबोधन करणे हा मूळ हेतू समोर ठेवला आणि समस्त हिंदू धर्मियांचे कंठमणी छत्रपती संभाजीराजे यांचा जीवनपट उलगडून दाखवला आहे.

बुद्धिमत्ता, पराक्रम, राजनीती कौशल्य, युद्धकौशल्य, जनतेप्रति आपुलकी हे महाराजांचे सारे पैलू अनुक्रमे बुद्धिबळाचे डावपेच, वाघाशी झूंज, 'बुधभूषण' ग्रंथाची निर्मिती या आणि अशा विविध माध्यमांतून दाखवण्यात यशस्वी ठरल्याचे दिसून येते. यातील मूळ संकल्पना आणि दिग्दर्शन जितेंद्र मकू यांचे असून मूर्तिकार संदीप मोकल खारआंबोली, सहायक उल्हास मकू राजेंद्र मकू, समीर तोडणकर, स्वप्नील चोगले, व्हिडीओ एडिटिंग नीलतेज मकू, तर इतर सजावट वंश मकू,रिद्धी, रुपेश्री, रूचीला, ऋणी, विधी, देवश्री आर्वी, बल्लाळ, स्मिरा, शिवाय आणि साईश यांची आहे.

दरवर्षीप्रमाणेच मुरूडमधील गणेशभक्तांसह अभ्यासक, पत्रकार, महाविद्यालयीन विद्यार्थी, डॉक्टर, वकील यांची दर्शनासाठी लक्षणीय उपस्थिती पहावयास मिळत असून अनंत चतुर्दशीपर्यंत श्रीगणेशाचे दर्शन घेण्याचे आवाहन मकू कुटुंबियांनी भाविकांना केले आहे.

## कर्जत भालिवडी येथे फार्महाऊसमधून बंदूक आणि गोळ्यांची चोरी

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील भालिवडी येथील फार्महाऊसमधील बंगल्यातून अज्ञात चोरट्याने घरमालकाची बंदूक आणि गोळ्या चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पुढील गंभीर गुन्हेगारी घटना घडू नयेत म्हणून पोलीस प्रशासनाने अलर्ट मोडवर तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ठाणे पाचपाखाडी येथे राहणारे अरुण पांडुरंग मोहिते यांचा भालिवडी येथे फार्महाऊस आहे. राहण्यासाठी त्यांनी येथे आलिशान बंगला उभारला आहे. नेहमीप्रमाणे मोहिते १ सप्टेंबर रोजी फार्महाऊसवर दाखल झाले असता त्यांना त्यांच्या सुरक्षेसाठी ठेवलेली बंदूक (रिव्हॉल्वर) बेपत्ता असल्याचे लक्षात आले.

### पोलिसांकडून चोरट्याविरोधात गुन्हा दाखल

चोरट्याने किचनच्या लोखंडी जाळ्या फोडून बंगल्यात प्रवेश केला आणि थेट बेडरूममध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटावर हात साफ करत बंदूक व त्यातील चार जिवंत गोळ्या घेऊन तो पसार झाला. चोरीस गेलेली ही बंदूक मेडइन यूएसए या बनावटीची असल्याचे सांगण्यात आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच तक्रारदार अरुण मोहिते यांनी रात्री उशिरा कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तत्काळ पंचनामा करून अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

बंदूक व गोळ्या चुकीच्या हातात गेल्यास त्याचा वापर दहशत पसरवण्यासाठी किंवा गुन्हेगारीसाठी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ही घटना केवळ साधी चोरी न मानता गंभीर सुरक्षेचा दृष्टीने तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून समजते. कर्जत पोलिसांनी परिसरातील शेतमजूर, नोकरवर्ग तसेच सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे तसेच शस्त्र परवाना तपासून शस्त्राची खरी माहिती गोळा केली जात आहे.

या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण असून नागरिकांना कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा व्यक्ती आढळल्यास तत्काळ पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गणेशोत्सव उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

बुधवार, २७ ऑगस्टपासून सुरू झालेला गणेशोत्सव अत्यंत आनंदाने व भावभक्तीमय वातावरणात सर्वत्र साजरा झाला. गणपती व गौरींना मंगळवारी निरोप देण्यात आला.

गणरायाच्या आगमनानंतर गावागावांमध्ये आनंदोत्सव साजरा केला गेला. पारंपरिक व आधुनिक पद्धतीचा मेळ घालून गणेशोत्सवात जागरण करण्यात आले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जाखडी नृत्य, भजन, पारंपरिक पद्धतीचे नृत्य तसेच विविध कला प्रकारांचे सादरीकरण केले गेले. नृत्यांमध्ये महिला, मुली, तरुण-तरुणी तसेच वयस्कर नागरिकही सहभागी झाले. त्याचबरोबर पारंपरिक वाद्याचा वापर करून ठिकठिकाणी भजनाचे स्वर आळविले गेले. मनोभावे सेवा केल्यानंतर मंगळवारी गौरी गणपतींचे विसर्जन करण्यात आले.

## विघवली गावात दहा फुटी अजगराला सर्पमित्रांकडून जीवदान

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावजवळील विघवली गावातील ग्रामस्थ अनंत गोविंद साठे यांच्या घरामागील परिसरात त्यांचे चिरंजीव निशांत साठे यांना रात्री एकच्या सुमारास मोठा अजगर आढळून आला.



अनंत व निशांत यांनी ताबडतोब निलकंठ साठे, सरपंच वैष्णव साठे आणि गावातील इतर जाणकार मंडळी यांना बोलावले. त्यानंतर नीलकंठ आणि वैष्णव यांनी वंदन सापळे यांचे जावई सर्पमित्र अविनाश वाघे यांना पाचारण केले.

अविनाश वाघे यांच्या अथक प्रयत्नाने अजगराला पकडण्यात यश आले. अविनाश यांनी त्यांचे सर्पमित्र प्रशांत सुतार यांच्या मदतीने वन अधिकाऱ्यांच्या परवानगीने ताबडतोब मोठ्या जंगलात सोडून अजगराचे प्राण वाचविले.

या अजगराची लांबी साधारण दहा फुटापर्यंत, तर वजन पंधरा किलोपर्यंत होते. अविनाश वाघे आणि प्रशांत सुतार हे दोघेही शासनमान्य रेस्क्यू ऑपरेशन टीमचे सदस्य आहेत. या दोघांचेही ग्रामस्थांनी आभार मानले. पावसाळ्यात अशा प्रकारे सरपटणारे प्राणी दिसून येतात. त्यांना न मारता सर्पमित्रांना कळविण्याचे आवाहन आहे.

# कौशल्य विकास प्रशिक्षण योजना

जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, त्यांचे सर्वांगीण सक्षमीकरण व्हावे, यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जाते आणि १५ ते ४५ वयोगटातील उमेदवारांना यात सहभागी होण्याची संधी उपलब्ध आहे.

**१) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान**

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग राज्यातील युवक व युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना मागणी असलेल्या उद्योग सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी काम करत आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या स्थानिक विशेष गरजानुसार विशिष्ठ मागणीच्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाकरिता शैक्षणिक अर्हता ही प्रत्येक अभ्यासक्रमानुसार वेगवेगळी असू शकते. दहावी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण ते पदवीपर्यंतच्या उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ घेता येऊ शकतो. हे प्रशिक्षण तीन ते सहा महिने कालावधीचे (Short Term Courses) असतात.

विविध कोर्सचे कौशल्य प्रशिक्षण जिल्ह्यामध्ये कोठे उपलब्ध होऊ शकेल याची माहिती या विभागाच्या https://www.mahaswayam.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राज्यस्तरावर व किमान कौशल्य विकास कार्यक्रम हा जिल्हास्तरावर राबविला जातो. आजपर्यंत जिल्ह्यातून १०४९५ उमेदवारांनी या अभियानाचा लाभ घेतला आहे.

**२) प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास कार्यक्रम**

ग्रामीण भागातून शहराकडे होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण कमी करणेसाठी ग्रामीण भागात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी ग्रामीण कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण १४ प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत. त्याद्वारे आजमितीस एकूण ११ हजार ३० उमेदवारांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे.

**३) आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्येच कौशल्य विकास प्रशिक्षण उपलब्ध व्हावे याकरीता महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

महाविद्यालयीन शिक्षण घेऊन बाहेर पडताना विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण घेता यावे यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापना करण्यात आली आहे. या कौशल्य विकास केंद्रामधून आजमितीस एकूण १ हजार ३७ उमेदवारांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे.

**विशेष वैशिष्ट्ये**

सर्व उमेदवारांना मोफत कौशल्य प्रशिक्षण. १५ ते ४५ वयोगटातील पात्र उमेदवारांना प्रशिक्षणाची संधी. कोर्स पूर्ण झाल्यानंतर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये लक्षणीय वाढ.

अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : www.mahaswayam.gov.in कार्यालय : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग, दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०२९

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**























पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी परिसरातील गौरी गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, मंडळाचे सदस्य, भाविक उपस्थित होते.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com